प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ३० ऑगस्ट २०२४**

## सिडकोतर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधित डुंगी गावातील भूधारकांना २२.५% योजनेंतर्गत ६७ भूखंडांचे वाटप करण्याकरिता संगणकीय सोडत संपन्न

सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधित डुंगी गावातील भूधारकांना संपादित जमिनीच्या व बांधकामाच्या मोबदल्यापोटी २२.५% योजने अंतर्गत ६७ भूखंडांचे वाटप करण्याकरिता ३० ऑगस्ट २०२४ रोजी सिडको भवन येथे संगणकीय सोडत यशस्वीरीत्या पार पडली. राज्य शासनाने मंजूर केलेल्या पुनर्वसन आणि पुन:स्थापना पॅकेज अंतर्गत या भूखंडांचे वाटप करण्यात आले.

**या प्रसंगी श्री. शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. दिलीप ढोले, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, श्री. नवनाथ जरे, मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि), सिडको, श्री. प्रभाकर फुलारी, अतिरिक्त मुख्य अभियंता, श्री. बिंदू मुरलीधरन, वरिष्ठ परिवहन अभियंता, श्रीमती स्मिता शिरोडकर, वरिष्ठ नियोजकार हे अधिकारी उपस्थित होते.**

सिडकोतर्फे ता. पनवेल, जि. रायगड येथे ११६० हेक्टरवर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ साकारण्यात येत आहे. विमानतळ प्रकल्पाकरिता गाभा क्षेत्रातील ज्या भूधारकांची जमीन संपादित करण्यात आलेल्या भूधारकांकरिता महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेले पुनर्वसन आणि पुन:स्थापना पॅकेज सिडकोतर्फे देऊ करण्यात आले आहे. या पॅकेज अंतर्गत भूधारकांना संपादित जमिनीच्या व बांधकामाच्या मोबदल्यापोटी २२.५% योजने अंतर्गत पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्रात सर्व पायाभूत सुविधांनी विकसित असलेल्या भूखंडांचे वाटप करण्यात येते.

मौजे डुंगी हे विमानतळ प्रकल्प क्षेत्राच्या लगतचे गाव असूनही अतिवृष्टी, गावाची भौगौलिक परिस्थिती आणि स्टॉर्म वॉटर ड्रेनच्या कामांमुळे या गावाचे पुनर्वसन करणे आवश्यक असल्याचे CWPRS संस्थेतर्फे सिडकोला कळविण्यात आले होते. यामुळे सिडको संचालक मंडळाने ठराव करून डुंगी गावातील प्रकल्पबाधितांना गाभा

क्षेत्रातील प्रकल्पबाधितांप्रमाणेच पुनर्सनाचे पॅकेज देण्याचा निर्णय घेतला. त्याकरिता मा. जिल्हाधिकारी, रायगड यांच्या मार्फत डुंगी गावाच्या पुनर्सवनाबाबत सर्व्हेक्षण करण्यात येऊन प्रकल्पबाधितांची पात्रता निश्चित करण्यात आली.

यानुसार एकूण ६७ प्रकल्पबाधितांना २२.५% योजनेंतर्गत संगणकीय सोडतीद्वारे ६७ भूखडांचे वाटप करण्यात आले. एकूण ६७ भूखंडांपैकी ४६ भूखंड हे डुंगी गावातील पात्र बांधकामांकरिता गाभा क्षेत्रातील बांधकाम धारकांप्रमाणे मंजूर करण्यात आलेले, ९ भूखंड हे २२.५% योजनेंतर्गत तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात आलेले आणि १२ भूखंड हे पुनर्वसन आणि पुन:स्थापना योजने अंतर्गत नवीन पात्रता मंजुरी व तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात आलेले होते. संगणकीय पद्धतीने पार पाडण्यात आलेली सोडत प्रक्रिया ही पूर्णत: पारदर्शक, जलद आणि मानवी हस्तक्षेपविरहित होती.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**